माहे फेब्रुवारी-१६ ८२८७

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ३५५ ठ. क्र. ४८६ दि. १६/५/१६ ...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३५५

श्री. सिध्दरामेश्वर मंदिर परिसरात तलावा भोवती लाईटची सोय करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर कामाचे तातडीची व महत्वाची गरज लक्षात घेता सदरकामी सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र.९,९८,८०३/- इतक्या रक्कमेचे काम मक्तेदार आरती इलेक्ट्रीकल्स यांचेकडून मक्त्याच्या रक्कमेपेक्षा ०.५% कमी दराने काम तात्काळ मुं.प्रा.महा.अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) नुसार करुन घेणेस, उक्त अधिनियमांतर्गत जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथील होणेस तसेच सदर बाब मा. स्थायी समिती व मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३०-१२-१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थायी समिती ठराव क्र. ५७६, दि. २९-१-१६ चे शिफारसीप्रमाणे आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/~~मासुली~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३५६ ठ. क्र. ८९ दि. १४/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. २५ शुक्रवार पेठ खारीबावडी जामा मस्जिद ते कालिका मंदिर ते संजय दुध डेअरी ते विजापूर वेस लिबास कलेक्शन पर्यंत श्री. सिध्दरामेश्वर महायात्रा काठी मार्ग तातडीने रस्ता करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर कामाचे तातडीची व महत्वाची गरज लक्षात घेता सदर कामी सविस्तर पूर्वगणनपत्र क्र. १५,९९,८२६/- इतक्या रक्कमेचे काम मक्तेदार गायत्री कन्स्ट्रक्शन यांचेकडून मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १% कमी दराने काम तात्काळ मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) नुसार करुन घेणेस, उक्त अधिनियमांतर्गत जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथील होणेस, तसेच सदर बाब मा. स्थायी व मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २३-१२-१५ टिपणीप्रमाणे मा. स्थायी समिती ठराव क्र. ५७७, दि. २९-१-१६ चे शिफारसीप्रमाणे आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज ३६७ ठ. क्र. ५० दि. १९/५/१६ राजा ठवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३६७

सोलापूर शहरासाठी उजनी धरणातून भीमा नदीच्या पात्रामध्ये पाणी सोडण्याबाबत मा. मंत्री महोदय, जलसंपदा विभाग, मा. पालकमंत्री महोदय, सोलापूर जिल्हा व इतर संबंधित अधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे. मुख्यअभियंता विनिर्दिष्ट प्रकल्प जलसंपदा विभाग यांनी अधिक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ सोलापूर यांना दि. २७-१-२०१६ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत मा. महापालिका सभागृहाच्या निदर्शनास आणणेकामी मा. आयुक्त यांचेकडील जा.क्र.नआ/वै/४४९, दि. २८-१-२०१६ चे पत्राची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ३६८ ठ. क्र. ५९ दि. १९/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जुना पूना नाका येथील बाळे स्मशानभूमी समोरील रस्ता डांबरीकरण करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. २०१४-१५ र.रु. २३,०४,४६५/- चे तयार केले असून सदरकामी र.रु. २३.०४ लाख इतकी बजेट तरतूद उपलब्ध होवून मिळणे आवश्यक असलेने सदरचे पूर्वगणनपत्रकास व याकामी सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील भांडवली कामा अंतर्गत बजेट तरतूद उपलब्ध होवून मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-२-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सन २०१६-२०१७ भांडवली कामातील स्मशानभूमी सुधारणा या हेडमधून रक्कम उपलब्ध करुन देण्यास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३७० ठ. क्र. ५२
दि. १८-५-१६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



विभागीय कार्यालय क्र. १ लाईट विभागाकडील टेंपररी मजूर श्री. सैफन रहिमान शेख यांचे मुदतवाढीबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रकरणी संबंधित सेवकास मुतदवाढ देणेकामी मा.म.न.पा.चे मान्यतेची आवश्यकता असल्याने सदर प्रस्तावास मा.म.न.पा. ठराव क्र. ११८, दि. ८-६-२०१५ अन्वये दि. १२-११-२०१४ पासून पुढे अकरा महिन्याच्या कालावधीकरिता मुदतवाढीस मान्यता देण्यात आलेली असून, विभागीय अधिकारी यांचे निवेदनात नमूद कारणास्तव श्री. सैफन रहिमान शेख, टेंपररी मजूर यांची आवश्यकता असल्याने त्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. १४-१०-२०१५ पासून पुढे अकरा महिन्याच्या कालावधीकरिता मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.म.न.पा.चे मान्यतेस्तव मा. आयुक्त यांचे दि. २-२-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्राथमिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३७२ ठ. क्र. ५३
दि. १९/५/१६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



शासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार कार्यालयीन आदेशात नमूद १ ते ७ विभाग व कामकाज सौ. अमिता दगडे पाटील, सहाय्यक आयक्त (जनरल) यांच्याकडे सोपविण्यांत येत असलेबाबत जा. क्र.नआ/वै/४५८, आयुक्त यांचे कार्यालय सोलापूर दि. ५-२-२०१६ चे कार्यालयीन आदेश, उक्त बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ४९ नुसार मा. महानगरपालिकेस कळविणेबाबत मा. आयुक्त यांचे दि. ५-२-२०१६ चे कार्यालयीन आदेशाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ३५३ ठ. क्र. ५४
दि. १७/५/१६ राजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



शासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार कार्यालयीन आदेशात नमूद १ ते ४ विभाग व कामकाज श्री. प्रदीप साठे सहाय्यक आयक्त (महसूल) यांच्याकडे सोपविण्यांत येत असलेबाबत जा. क्र.नआ/वै/४५७, आयुक्त यांचे कार्यालय सोलापूर दि. ५-२-२०१६ चे कार्यालयीन आदेश, उक्त बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ४९ नुसार मा. महानगरपालिकेस कळविणेबाबत मा. आयुक्त यांचे दि. ५-२-२०१६ चे कार्यालयीन आदेशाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नामंजूर/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ज ३७५ ठ. क्र. ५५ दि. २६/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अवंती नगर पाण्याची टाकी येथील अभिमानश्री नगर प्लॉट नं. ११९/१/२८० मधील पाण्याचे पाईप लाईन शिप्ट करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक र.रु. २२,५९,९०१/- इतकेचे तयार केले असून, सदरकामी सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील भांडवली कामे पाण्याचे टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे या बजेट सदरी तरतूद उपलब्ध होवून मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-२-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. ३५५ ठ. क्र. ५६
दि. १८/५/१६ रोजी ठरता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य उपविधीस मान्यता मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २२५, दि. १४-१०-२०१५ अन्वये यापूर्वी उपविधीस दिलेली मान्यता तद्नंतर वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दीकरण करुन हरकती मागविले असता नागरिकांकडून कोणत्याही प्रकारच्या हरकती न आल्याने अंतीम मान्यतेसाठी उपविधी मा. सर्वसाधारण सभेकडे पाठविणेस मा. आयुक्त यांचे दि. ६-२-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. ३७६ ठ. क्र. ५८ दि. १८/५/१६ रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. येथे सामुहीक सांडपाणी प्रक्रिया केंद्र व सेक्टर ई येथील संप व पंप हाऊस दैनंदिन देखभाल दुरुस्ती तत्वावर पाच वर्षाकरिता चालविणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सध्याची महानगरपालिकेची आर्थिकस्थिती विचारात घेता सदर प्लॅट परिचलन करणे म.न.पा.स कठिण झालेले असलेने व एमआयडीसीमधील उद्योजकाकडून वसुलीस प्रतिसाद मिळत नसल्याने आज अखेर थकबाकीची वसुलीची रक्कम टॅक्स रक्कमेमध्ये समावेश करणे व सदरचा प्लँट परिचलनाची म.न.पा.मार्फत सुरु असलेली कार्यवाही बंद करुन एमआयडीसीमधील उद्योजकाकडून चालविणेबाबत दोन्ही उद्योजक संघटनांना कळविणेबाबत धोरणात्मक निर्णय होणेस्तव मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १-२-१६ चे टिपणीप्रमाणे धोरणात्मक मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या सहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.३८३ ठ. क्र.५६
दि. १८/५/१६ राजा ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ११ मधील देखमुख पाटील वस्ती मधील अंतर्गत रस्ते खराब झाल्याने सतत अपघात होत आहेत. सदरील भाग हा झोपडपट्टीचा भाग असून रस्त्यावर जागोजागी खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे सदरील रस्ते हे रहदारीस अडथळा निर्माण करतात. संपूर्ण देशमुख पाटील वस्ती मधील सर्व अंतर्गत रस्त्यांच्या दुरावस्था झालेली आहे. सदरच्या रस्त्याचे काम हे नगरसेवकांच्या भांडवली कामाच्या निधीतून होणे शक्य नाही. देशमुख पाटील वस्तीत ड्रेनेज व पाण्याची लाईन टाकण्याचे काम प्रथमच झाल्याने सदर रस्ते करणे गरजेचे आहे. कारण रस्त्यावर लोकांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे. सबब सदरील सर्व रस्त्यांचे प्लॅन व एस्टीमेट तयार करुन झोपडपट्टी सदरी तरतूद मिळणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हा सदरील रस्त्याची दुरुस्ती करणेकामी सोलापूर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामधील भांडवली कामाच्या खर्चाचा तक्ता सन २०१५-१६ मधील अ.क्र. १ रस्ते बांधणे या तरतूदीमधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच याकामी सन २०१६-१७ मधून रक्कम उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३८५ ठ. क्र.५८ दि.१६/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. १२ एम.एस.आर.डी. रस्ता अय्यंगार बेकरी ते वसंत विहार पर्यंतच्या रस्त्यास **संत मुक्ताई मार्ग** असे नामकरण करणेस व त्याप्रमाणे नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका